**आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे कार्यालय**
दुसरा मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०००२३.
**Fax No. २२६६२३७० * Tel. No. Jt. Commr. २२६२०२३८ * Dy. Commr. २२६६५५६९**
**E-mail – excise_commissioner@mahaonline.gov.in**

**वाचले** : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०११ / प्र. क्र. २८४ / १२, दि. २१-१०-२०११.

# परिपत्रक

क्रमांक - जीआरडी १२२०१४ / १९ / २-ब　　　　　　　　　　　　मुंबई,　दि. २३ एप्रिल, २०१९.

या विभागातील कार्यालय अधीक्षक संवर्गातील दि. ०१-०१-२०१९ ची (दि. ०१-०१-२०१८ ते दि.३१-१२-२०१८) तात्पुरती अतिरिक्त (Provisional Additional) ज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

विभागीय उपआयुक्त / अधीक्षकांनी त्यांच्या कार्यालयात कार्यरत असलेल्या कार्यालय अधीक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना सदरची ज्येष्ठता यादी दाखवून, ती त्यांनी पाहिल्याची नोंद त्यांच्या अभिलेखावर जतन करुन ठेवावी.

कार्यालय अधीक्षकांनी त्यांच्या जेष्ठतेबाबत व इतर माहितीबाबत जर काही आक्षेप असतील अथवा यादीमध्ये काही चुकीच्या नोंदी दर्शविल्या गेल्या असतील तर संबंधीत कार्यालय अधीक्षकांनी १५ (पंधरा) दिवसांच्या आत त्यांचे प्रतिवेदन, योग्य कागदपत्रांच्या स्वाक्षांकित केलेल्या छायांकित प्रतीसह संबंधीत विभागीय उप आयुक्त / अधीक्षक यांचे मार्फत या कार्यालयास सादर करावे. संबंधीत कर्मचाऱ्यांनी सेवाजेष्ठता यादीमध्ये नमूद केलेल्या त्यांच्या जेष्ठतेबाबत, जन्मदिनांक, सेवानिवृत्ती दिनांक, जातप्रवर्ग व इतर नोंदीबाबत खबरदारी घेणे आवश्यक आहे. तरी संबधीत कर्मचारी याबाबत खबरदारी घेत नसल्यामुळे त्यांच्या पदोन्नती व सेवानिवृत्तीच्या वेळी अडचणी निर्माण होतात. त्यामुळे अशा प्रकारे खबरदारी न घेणा-या कर्मचा-यांना व अधीक्षकांना देखील प्रस्तुत प्रकरणी जबाबदार ठरविण्यात येईल. तसेच अशा प्रकारचे प्रकरण उद्भवल्यास त्यास आयुक्तालय जबाबदार राहणार नाही, असे विभागीय उप आयुक्त / अधीक्षक यांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. त्याचप्रमाणे विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या निवेदनांचा विचार केला जाणार नाही. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या निवेदनांचा विचार करुन अंतिम स्वरुपात ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

परिपत्रकाची पोहोच संबंधीत विभागीय उप आयुक्त / अधीक्षक यांनी उलट टपाल द्यावी.

**मा. आयुक्तांच्या मान्यतेने.**

Tanuja 23/4/19

( तनुजा दांडेकर )
सह आयुक्त (प्रशासन),
राज्य उत्पादन शुल्क, मुंबई.

प्रति,

संबंधीत कर्मचारी
(मार्फत :- संबंधीत विभागीय उप आयुक्त / अधीक्षक)

प्रत,

१. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
२. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
३. आयुक्त कार्यालयातील सर्व कार्यालय अधीक्षक, कार्यासन क्र. २ ब, २ क, व १२.

## शासन निर्णय सा. प्र. वि. क्रमांक एसआरव्ही-२०११ / प्र. क्र. २८४ / १२, दि. २१-१०-२०११ नुसार

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क विभागातील कार्यालय अधीक्षक ( मंजुर पदे - ५२ ) संवर्गात दिनांक ०१-०१-२०१८ ते ३१-१२-२०१८ या कालावधीत पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांची तात्पूरती अतिरिक्त ( Provisional Additional ) सेवा जेष्ठतासुची.

| अ. क्र. | ज्येष्ठता क्र. | नाव | जात प्रवर्ग | जन्मतारीख | कार्यालय अधीक्षक पदावर पदोन्नतीचा/ हजर दिनांक | नियुक्तीचा मार्ग | ज्येष्ठता दिनांक / ज्येष्ठतेचा मानिव दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | ५१ | श्री. र. अ. पांडे | इ.मा.व. | ०१-०३-१९७० | १४-०५-२०१८<br>१०-०५-२०१८ | पदोन्नतीने | १०-०५-२०१८ | २८-०२-२०२८ | बी.कॉम | |
| २ | ५२ | श्रीमती सु. ग. परब | खुला | २८-०३-१९७९ | २२-०५-२०१८<br>१०-०५-२०१८ | पदोन्नतीने | १०-०५-२०१८ | ३१-०३-२०३७ | एस.एस.सी. | |
| ३ | ५३ | श्रीमती नं. च. मोरे | खुला | ०८-०९-१९६१ | ११-०५-२०१८<br>१०-०५-२०१८ | पदोन्नतीने | १०-०५-२०१८ | ३०-०९-२०१९ | एस.एस. सी. | |

टिप : शासनपत्र, सा.प्र.वि.,क्र. बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२/१६-ब, दि. २८-१२-२०१७ मधील निर्देशाच्या अनुषंगाने सदर पदोन्नती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात, सेवाजेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातील पदांवर मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/ २०१७ मधील निर्णयाच्या अधीन राहून देण्यात आलेली असल्याने संबंधितास नियमित पदोन्नतीचे, जेष्ठतेचे किंवा अन्य कोणतेही हक्क प्राप्त होणार नाही.

**मा. आयुक्तांच्या मान्यतेने.**

Tanuja 23/12/18

(तनुजा सु. दांडेकर)
सह आयुक्त (प्रशासन),
आयुक्तांकरीता